| | |
|---|---|
| **MHSN-13-000830-2023** | खटला दाखल तारीख : ०७/०९/२०२३<br>खटला नोंद तारीख : ०८/०९/२०२३<br>निकालाची तारीख : १५/०४/२०२६<br>खटल्याचा कालावधी : ०२ व. ०७ म. ०८ दि. |

**भाग– अ**

**कडेगांव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कडेगांव यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी – श्रीमती माधवी र. पाटकर)**
निकाल तारीख – १५/०४/२०२६

**नि.फौ.खटला क्र.१०९/२०२३** **निशाणी क्र.३०**

**चिंचणी वांगी पोलिस ठाणे गु.र.क्र.९१/२०२३** – भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ३२४,३२३,५०४,५०६ प्रमाणे.

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>**चिंचणी वांगी पोलीस ठाणे,**<br>**ता.कडेगांव, जि.सांगली.** |
| **विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता** | श्री.ए.डी.आवळे,श्रीम.एस.एस.यादव |
| **आरोपी** | **श्री.आत्माराम गोरख साठे,**<br>वय – ३० वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा.कोतवडे, ता.कडेगांव,जि.सांगली. |
| **आरोपी तर्फे विधिज्ञ** | श्री.एस.पी.पाटील |

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १३/०६/२०२३ |
| प्रथम खबर अहवालाचा दिनांक | १४/०६/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०७/०९/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ३१/०७/२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | ०२/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयास राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १५/०४/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाचा दिनांक, जर असल्यास | निरंक |

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.04.15 18:46:54 +0530

**आरोपींची सविस्तर माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | देण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता, १९७३ चे कलम ४२८ नुसार खटल्याचे दरम्यान अटकेतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आत्माराम गोरख साठे | निरंक | २५/०९/२०२३ | भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३,५०४, ५०६ प्रमाणे. | **निर्दोष** | निरंक | निरंक |

**भाग क**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ.** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १ | श्रीम.निलम आत्माराम साठे | फिर्यादी | २० |
| २ | श्री.तानाजी शिवाजी सकट | साक्षीदार | २२ |
| ३ | श्री.तुषार तानाजी सकट | साक्षीदार | २३ |
| ४ | श्रीम.रंजना तानाजी सकट | साक्षीदार | २४ |

**ब.** आरोपीतर्फे साक्षीदार – निरंक

**क.** न्यायालयीन साक्षीदार – निरंक

**अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन कागदोपत्री पुराव्यांची यादी**

**अ.** अभियोग पक्षाचा कागदोपत्री पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| पी–१/१ | दि.१३/०६/२०२२ रोजीच्या वर्दीजबाबावरील फिर्यादीची सही. |
| २७ | दि.१४/०६/२०२२ रोजीचा घटनास्थळ व मुद्देमाल जप्ती पंचनामा |
| २८ | फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) चे वैद्यकीय प्रमाणपत्र |

**ब.** आरोपीतर्फे कागदोपत्री पुरावा – निरंक

**क.** न्यायालयीन कागदोपत्री पुरावा – निरंक

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.04.15 18:47:07 +0530

**ड.** मुद्देमाल

| अ. क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | ज.मु.र.क्र. १४३/२०२३ | एक कळकाची काठी |

# न्यायनिर्णय

**(पारीत दि.१५/०४/२०२६)**

**०१.** प्रस्तुत खटला आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता,१८६० (यापुढे ज्यास थोडक्यात 'दंड संहिता' असे संबोधले आहे.) चे कलम ३२४,३२३,५०४,५०६ खालील अपराधासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः**

**०२.** आरोपी व फिर्यादी निलम आत्माराम साठे (अ.सा.क्र.१) हे पाचवड फाटा, विटा, ता.खानापूर, जि.सांगली येथील रहिवासी असून आरोपी हा फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) चा पती आहे. दि.१३/०६/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजता फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) ह्या घरी असताना आरोपी दारु पिवून घरी आला. फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) ह्या आरोपीला 'अक्षता पोल्ट्रीवर अंडी गोळा करणेसाठी जायचे आहे तुम्ही माझेसोबत चला' असे म्हणाली, त्यावर आरोपी 'मी तुझेसोबत येणार नाही, तुझे तु जा' असे म्हणाली असता फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) ने आरोपीला तिचेसोबत येण्याचा आग्रह केल्याने आरोपीने चिडून जावून फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) ला लाथाबुक्यांनी मारहाण करुन जवळ पडलेल्या काठीने उजवे हातावर व डोकीत मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) हिने तिचा भाऊ तुषार तानाजी सकट (अ.सा.क्र.३) रा.साळशिंगे रोड, विटा याला सदर प्रकार सांगितलेने तुषार (अ.सा.क्र.३) याने आई, वडीलांसोबत फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) चे घरी येवून आरोपीला मारहाणीबाबत विचारणा केली असता त्यांना देखील आरोपीने शिवीगाळ व धमकी देवून लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर, फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१), फिर्यादीचा भाऊ तुषार (अ.सा.क्र.३) व फिर्यादीचे आई–वडील हे विटा पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यास गेले असता, पोलीसांनी औषधोपचारासाठी यादी दिल्याने त्यांनी ग्रामीण रूग्णालय विटा येथे उपचार घेतल्यानंतर फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) हिने दि.१३/०६/२०२३ रोजी विटा पोलीस ठाणे येथे वर्दीजबाब दाखल केला असता त्यानुसार विटा पोलीस ठाणे येथे दाखल झालेल्या गुन्ह्याचे काम चिंचणी वागी पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले व दि.१४/०६/२०२३ रोजी चिंचणी–वांगी पोलीस ठाणे गु.र.क्र.९१/२०२३ दंड संहितेचे कलम ३२४,३२३,५०४,५०६ प्रमाणे आरोपीविरुध्द दाखल झाला. सदर गुन्हा तपासाकरीता चिंचणी–वांगी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार/१५७४ श्री.जी.ए.तांदळे यांचेकडे सोपविण्यात आला. त्यांनी सदर

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.04.15 18:47:12 +0530

गुन्ह्याचे तपासादरम्यान दोन पंच श्री.सुरेश उत्तम सरतापे व श्री.राजेंद्र शिवाजी महाडीक यांचेसमक्ष घटनास्थळ व मुद्देमाल जप्तीचा पंचनामा करुन मुद्देमाल एक कळकाची काठी जप्त केली. त्यांनी साक्षीदारांचे जबाबाचे तपासटिपण नोंदविले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. तपासाअंती आरोपीने दंडसंहितेचे कलम ३२४,३२३,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला, असे निष्पन्न झाल्याने तपास अधिकारी श्री.तांदळे यांनी आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** प्रस्तुत खटल्याचे कामी भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याचा दोषारोप आरोपीविरुद्ध नि.क्र.१३ वर मी निश्चित केला असुन आरोपीने गुन्हा नाकबूल केला व अभियोगाची संपरीक्षा घेण्याची मागणी केली. त्याप्रमाणे आरोपीचे प्रतिकथन नि.क्र.१४ लगत नोंदविलेले आहे. अभियोग पक्षातर्फे चार साक्षीदार तपासण्यात आल्यानंतर नि.क्र.१६ वरील आरोपी व फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) यांची संयुक्त तडजोड पुरसिस विचारात घेता अभियोग पक्षाचा पुरावा बंद केलेबाबत नि.क्र.१ येथे दि.२५/०३/२०२६ रोजी आदेश करण्यात आला आहे. अभियोग पक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्यात आरोपी हे दोषी असल्याबाबत कोणतेही कथन आलेले नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे निवेदन नोंदवण्यात आलेले नाही व तसा आदेश नि.क्र.१ येथे दि.२५/०३/२०२६ रोजी करण्यात आला आहे. आपल्या बचावासाठी आरोपीने स्वतः शपथेवर साक्ष दिलेली नसुन कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा या कामी हजर केलेला नाही.

**०४.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. या खटल्यातील अभिलेखाच्या अवलोकनानंतर प्रस्तुत खटल्याच्या अंतिम निर्णयासाठी माझ्यापुढे उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील माझे कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेतः-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **०१.** | वर नमुद तारखेस, ठिकाणी व वेळी आरोपीने आपल्या हातातील काठीने फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) ला उजवे हातावर व डोकीत मारहाण केली, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **नाही.** |
| **०२.** | वर नमुद तारखेस, ठिकाणी व वेळी आरोपीने फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांना लाथाबुक्यांनी मारून दुखापत केली, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **नाही.** |
| **०३.** | वर नमुद तारीख व वेळी आरोपीने फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार | |

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.04.15 18:47:21 +0530

| | | |
|---|---|---|
| | (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांना दमदाटी करुन धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **नाही.** |
| **०४.** | वर नमुद तारखेस, ठिकाणी व वेळी फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांच्याकडून शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने आरोपीने त्यांना शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **नाही.** |
| **०५.** | आरोपीने कोणता अपराध केलेचे सिद्ध झाले आहे काय? | **नाही.** |
| **०६.** | आदेश काय? | **आरोपीला दोषमुक्त करण्यात येते.** |

# कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ५ करीताः–**

**०५.** प्रस्तुत खटल्यातील पुराव्याचा विचार करता मुद्दा क्र.१ ते ५ हे एकमेकांशी संबंधीत असल्यामुळे मुद्दा क्र.१ ते ५ एकत्रितपणे चर्चेस घेतले आहेत. अभियोग पक्षाच्या कथनानुसार, 'आरोपीने फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) ला कळकाचे काठीने उजवे हातावर व डोकीत मारहाण केली, तसेच फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांना आरोपीने लाथाबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करुन धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्याद्वारे आरोपीने दंड संहितेचे कलम ३२४,३२३,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे.' असा आरोप आहे.

**०६.** आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१), फिर्यादीचे वडील तानाजी (अ.सा.क्र.२), फिर्यादीचा भाऊ तुषार (अ.सा.क्र.३) व फिर्यादीची आई रंजना (अ.सा.क्र.४) यांची साक्ष नोंदविण्यात आली असून ते घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत, असे अभियोग पक्षाचे कथन आहे. परंतु, फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नाहीत, म्हणून सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना न्यायालयाच्या परवानगीने भारतीय पुरावा कायद्याचे कलम १५४ नुसार उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले. परंतु, त्यामधुन अभियोग पक्षाच्या कथनाच्या पुष्ट्यर्थ काहीही

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.04.15 18:47:30 +0530

निष्पन्न झालेले नाही.

०७. फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले आहे की, त्यांच्या घरी त्या, त्यांचे पती व दोन मुले असे राहतात व त्या पोल्ट्रीचे काम करतात, आरोपी त्यांचे पती असून दि.१३/०६/२०२३ रोजी त्या व आरोपी यांच्यामध्ये अंडी काढायला जाण्याच्या कामावरुन किरकोळ वादावादी झाली होती व आरोपीने त्यांना मारहाण केली नव्हती. त्यानंतर, न्यायालयाच्या परवानगीने भारतीय पुरावा कायद्याचे कलम १५४ नुसार अभियोग पक्षातर्फे उलटतपासणीच्या स्वरूपात फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) यांना प्रश्न विचारण्यात आले असता 'आरोपीने फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) ला कळकाचे काठीने उजवे हातावर व डोकीत मारहाण केली, तसेच फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांना आरोपीने लाथाबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करुन धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला', अशी घटना घडल्याची बाब फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) यांनी नाकारली असुन त्यांनी मान्य केले आहे की, 'दि.१३/०६/२०२३ रोजीच्या वर्दीजबाबावर त्यांची सही आहे व आरोपीसोबत त्यांची तडजोड झाली आहे.'

०८. साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले आहे की, आरोपी त्यांचे जावई असून फिर्यादी निलम साठे ही त्यांची मुलगी आहे, साधारण एक वर्षापुर्वी संध्याकाळी साडेचार वाजता पाचवड फाट्याजवळ पोल्ट्री फार्मवर आरोपी व त्यांची मुलगी निलम या नवरा-बायकोचे भांडण झाले होते, त्यांच्या मुलीने त्यांना फोन केला होता, त्यामुळे ते, त्यांची पत्नी रंजना व त्यांचा मुलगा तुषार पोल्ट्री फार्मवर आले होते, त्यावेळी तिथे आरोपी व त्यांची मुलगी निलम यांची भांडणे झाली, झटापट झाली व त्यानंतर ते घरी गेले, पोलीसांनी त्यांचेकडे चौकशी केली नव्हती. अभियोग पक्षातर्फे न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासणीच्या स्वरुपामध्ये तानाजी (अ.सा.क्र.२) यांना प्रश्न विचारण्यात आले असता दि.१५/०६/२०२३ रोजी चिंचणी वांगी पोलीसांनी त्यांचेकडे चौकशी करुन त्यांचे जबाबाचे तपासटिपण नोंदविल्याचे कबुल केले आहे, परंतु, दि.१५/०६/२०२३ रोजीच्या त्यांचे नावच्या जबाबाच्या तपासटिपणातील मारहाण, धमकी व शिवीगाळीच्या घटनेबाबतचा मजकुर का लिहीला आहे याचे कारण त्यांना सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे. तसेच त्यांची मुलगी सध्या आरोपीसोबत नांदत असल्याचे कबुल केले आहे.

०९. साक्षीदार तुषार (अ.सा.क्र.३) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले आहे की, आरोपी त्यांचे दाजी असून फिर्यादी निलम साठे ही त्यांची बहिण आहे, सन २०२३ मध्ये एके दिवशी सकाळी त्यांची बहिण निलमचा त्यांना फोन आला होता आणि तिने वादावादी झाल्यामुळे ती काम सोडणार आहे असे सांगितले, अजुन काही घडले नव्हते व पोलीसांनी त्यांचेकडे चौकशी केली नव्हती. अभियोग पक्षातर्फे न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासणीच्या स्वरुपामध्ये तुषार (अ.सा.क्र.३) यांना प्रश्न विचारण्यात आले असता

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.04.15 18:47:40 +0530

त्यांची बहिण सध्या आरोपीसोबत नांदत असल्याचे त्यांनी कबुल केले आहे व दि.१५/०६/२०२३ रोजीच्या त्यांचे नावच्या जबाबाच्या तपासटिपणातील मारहाण, धमकी व शिवीगाळीच्या घटनेबाबतचा मजकुर का लिहीला आहे याचे कारण त्यांना सांगता येणार नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

**१०.** साक्षीदार रंजना (अ.सा.क्र.४) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले आहे की, आरोपी त्यांचे जावई असून फिर्यादी निलम साठे ही त्यांची मुलगी आहे, दोन अडीच वर्षांपुर्वी त्यांची मुलगी निलम पोल्ट्री फार्मवर राहायला होती, तिथे त्यांचे काही घरगुती वाद झाले होते, काय घटना घडली होती हे त्यांना माहित नाही, त्या त्यावेळी तिथे नव्हत्या व पोलीसांनी त्यांचेकडे चौकशी केली नव्हती. अभियोग पक्षातर्फे न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासणीच्या स्वरुपामध्ये मध्ये रंजना (अ.सा.क्र.४) यांना प्रश्न विचारण्यात आले असता त्यांची मुलगी सध्या आरोपीसोबत नांदत असल्याचे कबुल केले आहे व दि.१५/०६/२०२३ रोजीच्या त्यांचे नावच्या जबाबाच्या तपासटिपणातील मारहाण, धमकी व शिवीगाळीच्या घटनेबाबतचा मजकुर का लिहीला आहे याचे कारण त्यांना सांगता येणार नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

**११.** फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांच्या साक्षीचे अवलोकन करता असे दिसून येते की, 'आरोपीने फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) ला कळकाचे काठीने उजवे हातावर व डोकीत मारहाण केली, तसेच फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांना आरोपीने लाथाबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करुन धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला', अशी घटना घडल्याची बाब फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांनी न्यायालयासमक्ष कथन केलेली नाही. सबब, फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांची साक्ष हा आरोपीने अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे गुन्ह्याचे कृत्य केले असल्याचा सबळ पुरावा ठरत नाही.

**१२.** अभिलेखावर आलेला पुरावा विचारात घेता असे दिसून येते की, अभियोग पक्षाचे कथन म्हणजेच फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) यांनी दाखल केलेली प्रथम खबर व न्यायालयासमोर फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) यांनी दिलेली साक्ष यामध्ये विसंगती आहे. तसेच, फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) यांच्या साक्षीपुराव्यावरून आरोपीने अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे गुन्ह्याचे कृत्य केले असल्याबाबत कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही.

**१३.** 'आरोपीने फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) ला कळकाचे काठीने उजवे हातावर व डोकीत मारहाण केली, तसेच फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.04.15 18:47:47 +0530

(अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांना आरोपीने लाथाबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करुन धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्याद्वारे आरोपीने दंड संहितेचे कलम ३२४,३२३,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे,' असा अभियोग पक्षाचा आरोप आहे. परंतु, सदर बाब अभियोग पक्षातर्फे साक्षीदार म्हणजेच, फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये न्यायालयासमोर कथन केलेली नाही. अशा परिस्थितीत, अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर आलेला पुरावा हा आरोपीने अभियोग पक्षाचे कथनानुसार गुन्ह्याचे कृत्य केले असल्याचा निष्कर्ष काढण्यासाठी सबळ विश्वासार्ह पुरावा ठरत नाही. त्यामुळे, आरोपीने अभियोग पक्षाचे कथनानुसार गुन्ह्याचे कृत्य केले असल्याचे अभियोग पक्ष निःसंशयपणे सिद्ध करु शकलेला नाही. सबब, मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तर मी 'नकारार्थी' देते आणि माझे निष्कर्ष नोंदविते.

**<u>मुद्दा क्र.६ करीताः</u>–**

**१४.** उपलब्ध पुरावा पाहता तसेच उभय पक्षांच्या विधिज्ञांचे युक्तीवाद ऐकता हे स्पष्ट होते की, 'आरोपीने फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) ला कळकाचे काठीने उजवे हातावर व डोकीत मारहाण केली, तसेच फिर्यादी निलम (अ.सा.क्र.१) आणि साक्षीदार तानाजी (अ.सा.क्र.२), तुषार (अ.सा.क्र.३) व रंजना (अ.सा.क्र.४) यांना आरोपीने लाथाबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करुन धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्याद्वारे आरोपीने दंड संहितेचे कलम ३२४,३२३,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे,' असे अभियोग पक्षाने निःसंशयपणे सिद्ध केलेले नाही. वरील सर्व गोष्टींचा विचार करता, आरोपीविरुद्ध दंड संहितेचे कलम ३२४,३२३,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा सिद्ध न झाल्याने आरोपीला दोषमुक्त करणे न्यायोचित आहे. प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल एक कळकाची काठी मुल्यविरहित असल्याने अपिल कालावधीनंतर नाश करण्याचा आदेश करणे योग्य ठरेल. सबब, मुद्दा क्र.६ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते : –

**– <u>आदेश</u> –**

**०१.** आरोपीला भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ३२४,३२३,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये दोषमुक्त करण्यात येते.

**०२.** आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते व आरोपीला मुक्त करण्यात येते.

**०३.** प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल एक कळकाची काठी ही मुल्यविरहीत असल्याने अपिल कालावधीनंतर नाश करण्यात यावी.

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.04.15 18:47:53 +0530

**०४.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे जामीनाची पुर्तता करण्यासाठी प्रत्येकी र.रु.१५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका व जामीन बंधपत्र द्यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये घोषित करण्यात आला.)**

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.04.15 18:48:00 +0530

स्थळ– कडेगांव
दिनांक–१५/०४/२०२६

**(श्रीम.माधवी र.पाटकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कडेगांव.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order".

| | |
|---|---|
| Name of the Court | Hon'ble Smt.M.R.Patkar<br>CJJD & JMFC, Kadegaon |
| Name of the Stenographer | Shri.V.S.Patil, Stenographer |
| Date of Judgment/Order | 15/04/2026 |
| Judgment/Order signed by P.O. | 15/04/2026 |
| Judgment/Order uploaded on | 15/04/2026 |